RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ९, अंक १८(३)] मंगळवार, मे २३, २०२३/ज्येष्ठ २, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मे २०२३.

**अधिसूचना-२**

**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१.**

क्रमांक एसजीए. २०२३/प्र.क्र.७८/काम-५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ६ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए-१५०८/प्र.क्र.१२३६/ काम-५, दिनांक ५ जून २००९ (यापुढे याचा "उक्त अधिसूचना"असा उल्लेख करण्यात येईल) अन्वये विविध जिल्ह्यांसाठी, ज्यामध्ये सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यांकरीता सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना केली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए-२०२३/प्र.क्र.७८/काम-५, दिनांक /०५/२०२३ सातारा जिल्ह्यासाठी सातारा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ स्थापन केले आहे ;

आणि ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यासाठी सातारा जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ स्थापन केल्यामुळे उक्त अधिसूचनेमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने, सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून सातारा जिल्हा वगळण्यात येत आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र शासन सदर उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन उक्त अधिसूचना खालीलप्रमाणे सुधारीत करीत आहे :—

सदरहू अधिसूचनेतील अनुसूचीमधील अनुक्रमांक २ येथील सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या स्तंभ ( ३ ) मधील “सातारा” शब्द वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दादासाहेब खताळ,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 23rd May 2023.

*NOTIFICATION-2*

MAHARASHTRA PRIVATE SECURITY GUARDS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1981.

No. SGA. 2023/C.R.78/LAB-5,—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. SGA.1508/C.R.1236/LAB-5, dated the 5th June 2009 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 6 of Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act, 1981 (Mah.LVIII of 1981), established Security Guards Boards for various districts including the Sangli District Security Guards Boards for the areas of Sangli, Satara and Solapur Districts;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.SGA-2023/C.R.78/LAB-5, dated the /05/2023 issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 6 of the said Act established a Satara District Security Guards Board for the area of Satara District;

And whereas, in view of establishment of Satara District Security Guards Boards for the area of Satara District, it is necessary to amend the said Notification for excluding the area of Satara District from the jurisdiction of Sangli District Security Guards Boards;

Now, therefore, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 6 of the said Act, hereby amends the said Notification as follows :—

In the said Notification, in the Schedule appended thereto, in entry at serial number 2, regarding the Sangli District Security Guards Board, in Column (3), the word "Satara" shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DADASAHEB KHATAL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.